RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ४५] सोमवार, एप्रिल ४, २०२२/चैत्र १४, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १०४

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ एप्रिल २०२२

### आदेश

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस ०८२१/प्र.क्र.१३९/राउशु-२.—महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) चे कलम १३९ च्या उप-कलम (१) च्या खंड (क) नुसार महाराष्ट्र शासनास प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ अंतर्गत मंजूर केलेल्या पीएलएल घटकांना, भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याची न्युट्रल पॅकींगमधून परदेशात निर्यात करावयाची असल्यास, महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ च्या कलम १७ च्या उपकलम (२४) व (३०) मध्ये खालील अटींच्या अधीन राहून सूट देण्यात येत आहे,—

(१) *(i)* भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याची न्युट्रल पॅकींगमधून परदेशात निर्यात करण्यास परवानगी मिळण्यासाठी अनुज्ञप्तीधारक आयुक्तांकडे अर्ज करेल.

*(ii)* आयुक्त हे त्या अर्जाची आवश्यकतेनुसार चौकशी करतील व अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे परवानगी देण्यास काही हरकत नाही अशी खात्री झाल्यावर, ते तशी परवानगी देतील.

(२) भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याची न्युट्रल पॅकींगमधून भारताबाहेर निर्यात करावयाची असल्यास अनुज्ञप्तीधारक खालील बाबी लेबलवर नमूद करेल :—

*(i)* भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या ब्रँडचे नाव;

*(ii)* मद्याची तिव्रता (v/v मध्ये);

(*iii*) घटकांचे प्रमाण ;

(*iv*) बॅच नंबर;

(*v*) निर्मितीचा महिना व वर्ष ;

(*vi*) विदेशी मद्य आयातदाराचे नाव व पत्ता ; आणि

(*vii*) परदेशातील आयात प्राधिकाऱ्याने विहित केलेला मजकूर.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 4th April 2022

### Order

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MIS 0821/C.R.139/EXC-2.—In exercise of the powers conferred by clause (c) of sub-section (*1*) of section 139 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby exempts, the licensee holding licence in Form PLL granted under the Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor Rules, 1966, intended to export Indian made Foreign Liquor in neutral packing, from provisions of sub-rule (24) and (30) of rule 17 of the said Rules. Subject to following condition,—

(1) (*i*) The licensee shall make an application to the Commissioner for permission to export Indian made Foreign Liquor in neutral packing.

(*ii*) The Commissioner shall make such enquiries as he deems fit and being satisfied that there is no objection to grant the permission, he may grant the approval.

(2) The licensee shall while exporting Indian made Foreign Liquor in neutral packing out of India, put the following details on the label :—

(*i*) Brand name of Indian made Foreign Liquor ;

(*ii*) alcoholic strength in v/v ;

(*iii*) volume of contents ;

(*iv*) batch number ;

(*v*) month and year of manufacture ;

(*vi*) name and address of foreign importer ; and

(*vii*) contents prescribed by foreign import authority.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.